# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**

**दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५**

**दूरध्वनी क्र :- २८४९७५०४**

**७७ व्या कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजार - २०२४ मध्ये सहभागाकरिता अटी व शर्ती :-**

१. कान्स आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - २०२४ फिल्म बाजारमध्ये भाग घेण्यासाठी दि.०१ जानेवारी, २०२३ ते दि.३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीत सेन्सॉर प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या मराठी चित्रपटांचा समावेश असेल.

२. सदर जाहिरातीचा कालावधी दिनांक दि.३०/०१/२०२४ ते १५/०२/२०२४ असा आहे.

३. निर्माते / निर्मिती संस्थांनी त्यांचे अर्ज cfffm2024@gmail.com या ई-मेल वर सादर करावेत.

४. चित्रपटाची लांबी कमीत कमी ९० मिनिटे असावी (फिचर फिल्म)

५. इतर भाषेतील रिमेक, डब किंवा सबटायटल असलेल्या मराठी चित्रपटांना सहभागी होता येणार नाही.

६. ज्या चित्रपटांची गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजार - २०२३ करिता महामंडळामार्फत निवड करण्यात आली होती अशा चित्रपटांना सहभागी होता येणार नाही.

७. महामंडळाकडे प्राप्त होणाऱ्या चित्रपटांच्या प्रस्तावांमधून परिक्षण समितीने निवड केलेल्या ३ चित्रपटांची निवड करण्यात येईल.

८. चित्रपटाची निवड कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजार - २०२४ करिता झाल्यास वेळोवेळी चित्रपटाची डिसीपी व केडीएम आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्याची जबाबदारी निर्माते / निर्मिती संस्थेची राहील.

९. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र.०२२-२८४९७५०४ तसेच भ्रमणध्वनी क्र. ९८१९६३८२२१ (श्री.मंगेश राऊळ) आणि ९७०२२७०८२१ (श्री.पंकज चव्हाण) या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

१०. कोणत्याही वेळी जाहिरात रद्द करण्याचे अथवा जाहिरातीमध्ये बदल करण्याचे सर्वाधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

-------------